# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. 263 /2023**

**विषय : संशोधन केंद्रामधील केंद्रप्रमुख/समन्वयक/प्राधिकृत कर्मचारी यांची माहिती विद्यापीठास कळविणेबाबत..**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रत्येक महाविद्यालयास/मान्यताप्राप्त संस्थेस प्रचलित नियमांच्या आधारे संशोधन केंद्र मान्य केले आहे. सदर संशोधन केंद्रामधील विद्यार्थ्यांना आवश्यक असणा-या सोयी-सुविधा आणि इतर आवश्यक प्रक्रियेची माहिती देण्याची जबाबदारी संबंधित संशोधन केंद्रांची, पर्यायाने त्या संशोधन केंद्र प्रमुखाची अथवा त्या प्रमुखांनी नेमलेल्या समन्वयकाची असते.

तसेच दैनंदिन स्वरूपात विद्यापीठाकडून पीएच.डी. संदर्भात विविध स्वरूपातील परिपत्रके, सूचना, इ. निर्गमित करण्यात येत असतात व त्यातील काही परिपत्रकांमध्ये कालमर्यादा ठरवून दिलेली असते. सर्व परिपत्रके विद्यापीठाच्या संकेतस्थळावर वेळोवळी प्रसिध्द करण्यात येतात. परंतु काही संशोधन केंद्रांकडून परिपत्रके, सूचना इ. वेळेत पाहिली जात नाहीत तसेच विलंबाने विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दिली जातात. परीणामत: संशोधक विद्यार्थी, संशोधन केंद्रे व विद्यापीठ यांना कामकाज करताना अडचणी निर्माण होतात.

त्याअनुषंगाने मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित संशोधन केंद्र यांना कळविण्यात येते की, यापुढे पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेसंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने सन 2022 मध्ये नव्याने प्रसिध्द केलेल्या नियंमासंदर्भात व प्रक्रियेसंदर्भात वेळोवळी कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना आवश्यक असणा-या सोयी-सुविधा आणि मदत संबंधित संशोधन केंद्रामध्ये उपलब्ध होण्यासाठी तसेच सर्व प्रकारचा पत्रव्यवहार, परिपत्रके, काही तातडीच्या सूचना इ. संबंधित संशोधन संस्थांना तातडीने कळविण्यासाठी ईमेल अथवा इतर माध्यमांचा वापर करण्यात येणार आहे.

वरील नमूद केलेले सर्व मुद्दे विचारात घेता, संशोधन केंद्राचे **केंद्रप्रमुख/समन्वयक/प्राधिकृत कर्मचारी** यांची माहिती खालीलप्रमाणे तातडीने या कार्यालयास कळविण्यात यावी, ही विनंती.

| अ.क्र. | केंद्रप्रमुख/समन्वयक/प्राधिकृत कर्मचारी यांचे नाव | पदनाम | भ्रमणध्वनी क्र. | ई-मेल |
|---|---|---|---|---|
| 1. | | | | |

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

संदर्भ: शै.प्रवेश/4433
दिनांक: 01/011/2023

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

मा. प्राचार्य/संचालक, विद्यापीठाशी संलग्नित सर्व संशोधन केंद्रे/संस्था.

C:\Users\pgadm\OneDrive\Desktop\General Circulars.docx